# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078

Address-sp office Bidco Road,Palghar west

E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ४७८ दिनांक २९.०५.२०२०

१. फिर्यादी महिला वय-२३ वर्षे, व्यवसाय-शिक्षण, रा- वसई पश्चिम, ता.वसई, जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.२८/०५/२०२० रोजी सकाळी १०.३० वा.चे सुमारास फिर्यादी हे एटीएमधुन पैसे काढून नायगाव ब्रिच, उमेळे गाव रोड, नायगाव स्टेशन पश्चिम, ता. वसई जि.पालघर येथे पायी चालत आले असता यातील आरोपीत याने फिर्यादीचे पाठीमागुन पायी चालत येवुन फिर्यादी यांचे हातातील रोख रक्कम, पर्स व मोबाईल असा १०,०००/- रुपये किमतीचा ऐवज जबरीने खेचुन चोरुन नेला म्हणुन **माणिकपुर पोलीस ठाणे** गु.र.नं. I २१२/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३९२ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

२. फिर्यादी पुरुष वय ४५ वर्षे, व्यवसाय- नोकरी रा. डहाणु ता. डहाणु जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि. २८/०५/२०२० रोजी १०.४५ वा. चे सुमारास फिर्यादी यांचा मयत भाऊ हा स्प्लेंडर मोटार सायकल नं. MH-04 BZ9045 हीचेवर मयत क्रमांक २ हिस पाठीमागे बसवून आशागड येथून डहाणू येथे येत असताना कन्या आश्रम शाळेजवळ पाठीमागून येणारा सफेद रंगाचा पिकअप नंबर माहित नाही हिचेवरील चालक याने त्याचे ताब्यातील पिकअप रस्त्याच्या नियमाकडे दुर्लक्ष करुन हयगयीने व अविचाराने भरधाव वेगात चालवून फिर्यादी यांचा मयत भाऊ याचे ताब्यातील मोटार सायकलला पाठीमागून जोराची ठोकर मारुन अपघात करुन अपघातात फिर्यादी यांचा मयत भाऊ व पाठीमागे बसलेली मयत हिस अपघातात गंभीर व किरकोळ स्वरुपाच्या दुखापती होवून त्याच्या मरणास कारणीभूत होऊन त्यांना दवाउपचाराकरीता न नेता व अपघाताची खबर न देता पळून गेला म्हणून **डहाणु पोलीस ठाणे** गु.र.नं. I ११७/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, मो.वा.का. क १८४, १३४(अ)(ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

३. फिर्यादी पोहवा/२१२२ गोविंद वाल्मीक भोईर , यांनी फिर्याद दिली की, दि.२८/०५/२०२० रोजी १२.०५ वा.चे सुमारास श्रमजीवी संघटने तर्फे रेशन कार्ड मिळणेकरीता व इतर मागण्या करीता आरोपीत क्रमांक १ व २ आणि इतर ४० ते ५० स्त्री व पुरुष कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालय मोखाडा येथे जमून कोणतेही सोशल डीस्टन्स न पाळता, कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव वाढण्याची जाणीव असतानाही गर्दी करुन हक्काग्रह आंदोलन केले म्हणुन **मोखाडा पोलीस ठाणे** गु.र.नं. II ५३/२०२० आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ५१(बी) भारतीय दंडसंहिता कलम १८८ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

४. फिर्यादी पोना/१३५६ विक्रम उत्तम पन्हाळकर नेम-वसई पोलीस ठाणे, यांनी फिर्याद दिली की, दि. २८/०५/२०२० रोजी ११.०० ते १५.३० वाजताचे सुमारास आरोपी यांनी वसई तहसील कार्यालय येथे हक्काग्रह आंदोलन करुन घोषणबाजी, गाणी बोलुन, मा. जिल्हाधीकारी पालघर तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर यांचेकडील मनाई आदेशाचा भंग केला, म्हणुन **वसई पोलीस ठाणे** गु.र.नं. II २४१/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.


Scanned by CamScanner